INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | FEBRUARY – 2017

# बौद्ध व्रजयान पंथाचा उदय व विकास

डॉ.प्रभाकर कोळेकर
सहायक प्राध्यापक,
ए.आय.एच.सी. आणि आर्कोलॉजी विभाग
स्कूल ऑफ सोशल सायन्स,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,

प्राचीन भारताच्या इतिहासात मानवतावादास व कर्म सिद्धांताद्वारे स्वकल्याणाबरोबर समाजकल्याण करणारे विचार इ.स.पू. 6 व्या शतकात गौतम बुद्धांनी मांडले. त्यांचा विचार साक्षेपी, अनुभवाधिष्ठीत, विज्ञानवादी व मध्यममार्ग, सर्वसामान्यास अनुकरणास सहज-सुलभ होता तो विचार म्हणजेच गौतम बुद्धांचा बौद्ध धर्म होय. सामाजिक व राजकीय पातळीवर सामान्यजनांना न्याय, गुणकर्माला महत्त्व देणारी आध्यात्मिक समतेबरोबर सामाजिक समता अस्तित्वात आणणारी, तांत्रिकदृष्ट्या आत्मा - परमात्मा, जन्म-पुनर्जन्म, ज्ञान-तत्त्वज्ञान या संघर्षात सामन्यांना गुंतवूण न ठेवता मध्यममार्ग, मानवतावादी, विज्ञाननिष्ठ व बुद्धीनिष्ठ विचार करणारी व प्रयत्नातून साध्याकडे नेणारी अनुभूतीजन्य विचारांची गरज निर्माण झाली. तत्कालीन वैदिक धर्माच्या अनिष्ठ रुढी - पंरपरा, कर्मकांडे, विषमता व श्रेष्ठ कनिष्ठत्वामूळे जी सामाजिक उद्देशाची जाणीव निर्माण झाली होती. त्याचवेळी वेगळ्या मार्गाने सामन्य जनतेच्या प्रयत्नास, कर्मास महत्त्व



देणारा साधा-सोपा, मध्यमवर्गी विचार गौतमाने बौद्ध धर्माच्या रुपाने दिला.

भारतातील बौद्ध धम्मसंघातील बदलाने तात्त्विक भेद, आचरण पद्धती, पंथवाद, बदलता राजाश्रय, हिंदू धर्माचे आक्रमक धोरणामूळे बौद्ध धम्माचे विविध पंथ निर्माण झाल्यानंतर त्याचा प्रभाव हा नकारात्मक न होता सकारात्मक रितीने झाला. प्रादेशिक, धार्मिक, सामाजिक व तात्त्विक वातावरणाची गरज व प्रोत्साहनातून विविध पंथानी आपले स्वत:चे असे वेगळे प्रभावाक्षेत्र निर्माण केले. काश्मीर, सिंध, पंजाब या भागात प्रारंभीच्या काळात हिनयान नंतर त्याच्या शाखा व त्यानंतर महायान पंथ व त्याच्या शाखा या जनमानसात लोकप्रिय झाल्या.

इ.स.पू. 6 ते इ. स. 4 थे शतका दरम्यान हिनयान पंथाचे व इ. स. 4 थे ते 10 व्या भारतातील विविध प्रदेशात महायान पंथाचा बौद्ध धम्मात विकास व प्रभाव निर्माण झाला होता. प्रत्येक प्रातांच्या विस्तारीत बहुव्याप्त क्षेत्रात बौद्ध धम्माच्या विविध पंथाचे अस्तित्व निर्माण व विकसित झाले. राजाश्रय, लोकाश्रय यामुळे बौद्धधम्म हा भारतात शहर, ग्राम व नगर या तिन्ही भागात सुस्थापीत झाला.

मध्यप्रांत, पूर्व प्रातांत मगध हे बौद्ध धम्माचे प्रमुख असे केंद्रस्थान होते. बंगालचा भाग हा इ. स.7 ते 12 व्या शतकामध्ये तत्रयान पंथाचे प्रमुख केंद्र म्हणून अनुयायांना आकर्षित करत होते. या भागातील बौद्ध विविध पंथातील स्तुप, चैत्य, विहारे, मठ हे पुढील काळात भारतीय शिक्षण व तत्त्वप्रणालीत बदल घडवून आणणारे प्रमुख असे वळण ठरले. यातून पुढे नालंदा, विक्रमशिला या सारखी प्रसिद्ध विद्यापीठे निर्माण झाली.

तथागत बुद्धांनी धम्म व संघाच्या मध्यममार्गी तत्त्वज्ञानानुसार सर्वसामान्य ते सम्राट पदापर्यंत सर्वच व्यक्ती व समुहास प्रभावित केले. धम्माचा प्रसार केवळ उत्तर भारतात झाला नाही तर त्याचा विस्तार दक्षिण व मध्य भारतात देखील अत्यंत वेगाने झाला. तत्कालीन समाजात बौद्ध मताचा प्रसार होईपर्यंत सामाजिक गतिशीलतेस अंकूश बसला होता. बौद्ध पंथाच्या काळात धम्माने दिलेली शिकवण व उपदेशानुसार समाजात स्वतंत्र विचारसरणी, समताधिष्ठीत समाजनिर्मिती, बंधुतेवर निर्माण झालेली होती. सामाजिक गतिशीलता यामुळे समाजात अनेक धर्म व पंथप्रवाह असताना देखील समाजात सामंजस्याचे व सौहार्दाचे वातावरण होते

समाजामध्ये जसजसे केंद्रीकृत राजकीय व्यवस्था व भौतिक संसाधनाचा विस्तार होऊ लागला, तसा अस्तित्त्वात असलेल्या धर्म-धम्मामध्ये विविध अशा पंथाचा उगम होऊ लागला. बदलत्या भौतिक व राजकीय शैलीचा प्रभाव धार्मिक क्षेत्रावर देखील पडल्याचे हे द्योतक होते.

इ.स.पू **3** ते इ.स. **9** व्या शतकापर्यंतचा हा काळ प्राचीन समाजात विविध मूळ धर्मातून उपपंथाच्या उगमाचा काळ होता. वैदिक धर्मात वैष्णव पंथ व शैव पंथाचा उगम होऊन विष्णू, कृष्णसंकर्षण या देवतांबरोबर रुद्र, शिव या एकच देवता आहेत हे निश्चित होऊन त्याची उपासना केली जाऊ लागली होती. त्याचप्रमाणे जैन धर्मात देखील नैसर्गिक आपत्तीमुळे चंद्रगुप्त मौर्याच्या काळात दक्षिणेकडे स्थलांतरीत झालेला आचार्य भद्रबाहूच्या नेतृत्वाखालील अनुयायी वर्ग हा दिगंबर तर उत्तर भारतीय जैन मतावलंबी श्वे तांबर म्हणून ओळखले जाऊ लागले.

या विविध धर्मपंथाप्रमाणेच बौद्ध धम्मातही विविध पंथाचा उगम झाला. त्यात प्रामुख्याने श्रावकयान (हिनयान) व महायान यांच्याबरोबर त्या दोहोतून उदयास आलेले **16** उपपंथ ही अस्तित्त्वात होते. या धम्मपंथाची उपासना पध्दत, तत्त्वज्ञानातील भेद व या भेदातून निर्माण झालेल्या साहित्यकृती यामुळे धम्मास सुरुवातीस सार्वत्रिक व लोकप्रिय स्वरुप मिळणे शक्य झाले, परंतु या उपासना पध्दती, तत्त्वभेद व साहित्यातून मांडल्या गेलेल्या विरोधात्मक विचारांमुळे पुढील काळात धम्मात विविध अशा धम्मबाह्य बाबींचा शिरकाव झाला. धम्म हा मूळ स्वरुपात न राहता त्यामध्ये विविध कर्मकांडे व विरोधाभासात्मक मतांचे वर्चस्व वाढले.

## तंत्रयान अथवा वज्रयान पंथ:

बौद्ध धम्मातील स्थित्यंतरामधील तिसरी महत्त्वपूर्ण अवस्था म्हणजे इ. सन **7** ते **12** व्या शतकादरम्यानचा तंत्रयान वज्रयान बौद्ध पंथाच्या उदयाचा व विकासाचा कालखंड मानला जातो. थेरवाद ते हिनयान, महासांघिक ते महायान, आणि महायान ते तंत्रयान अशी एकंदरीत बौद्ध धम्मसंघाची वाटचाल झाली होती. या पंथप्रवासातून बौद्ध वाङ्मयाच्या धार्मिक रचना अस्तित्त्वात आल्या व पुढील काळात या साहित्य रचनाच्या आधारेच, तत्कालीन धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे इतिहासाच्या दृष्टिकोनातून बांधणी शक्य झाली.

बौद्ध धम्म साहित्यामध्ये प्रतित झालेल्या तत्त्वज्ञानात भिक्षुने व उपासकाने स्वत:मध्ये अतिमानवी वा चमत्कारिक शक्ती असल्याची प्रौढी अथवा दंभ असल्याचे दर्शवू नये. क्वचितप्रसंगी बौद्ध वाङ्मयामध्ये 'चुल्लवग्गामध्ये' पुण्डोल भारद्वाज, उपासक मेंडक यासारख्या उदाहरणाद्वारे स्वत: बुद्ध हे अतिमानवी सिध्दीबाबत अनुत्सुक होते हे दिसून येते. इ.स.च्या **7** व्या शतकानंतर जेव्हा तंत्रयान या पंथाचा उदय झाला. त्यानंतर या संदर्भातील विविध वाङ्मय निर्मिती झाली. 'शांतरक्षित' च्या 'तत्त्वसंग्रह' व त्याच्यावरील कमलशील ह्या शिष्यांच्या ग्रंथ टीकामध्ये बुद्ध धम्म व चमत्कार, अतिमानवी शक्ती संदर्भातील उल्लेख दिसून येतो. हे ग्रंथ बुद्ध निर्वाणानंतर बाराशे वर्षांनी अस्तित्त्वात आले होते. हा तंत्रयानाच्या उत्कर्षाचा कालखंड होता. या तत्त्वसंग्रह ग्रंथातील 'सुगतोपदिष्टम' या शब्दाद्वारे यातील संवाद हे भगवान बुद्धांचे आहेत असा मिथ्याप्रचार केला

आहे. वास्तविकत:बुद्धानंतर याची रचना केली असल्याने बौद्ध वाङ्मयात हे विचार घुसवण्यात आल्याचे सिध्द होते.

## तंत्रयान म्हणजे काय?

अतिमानवी सिध्दीच्या प्राप्ती करता इ. सन **7** व्या शतकात उदयास आलेला पंथ असून या पंथात तंत्र, मंत्र, सिध्दीयंत्र, योग, मैथुन, तापदायक अथवा भितीदायक देवताचे, संकेत योजनेनुसार पुजन केले जाते. याकरिता विविध प्रकारच्या यंत्राचा उपयोग करुन, सांकेतिक सहगुणकाधारे चेटूक, जादूटोण्याचा समावेश करुन स्त्रीदेवतेंची पुजा करुन मुक्ती किंवा ध्येय सिध्द करण्याचा हा मार्ग होय.

इ.स. **7** व्या शतकात तांत्रिक बौद्ध धम्मपंथाचा उदय झाला होता. हे आता सर्वसामान्य झाले आहे. बी. बी. भट्टाचार्य, जी, तुशी, गोपिनाथ कवीराज आणि जी. सी. पांडे या संशोधकांनी मात्र या तंत्रयानाच्या उदयाची पार्श्वभूमी मैत्रियाचा आणि असंग कालखंडामध्ये शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तिबेटीय बौद्ध धम्म साहित्याच्या आधारे व चीन साहित्याच्या संदर्भानुसार या साहित्यामध्ये इ. स. **4** थ्या व **5** व्या शतकामध्ये या तंत्रयानाची पार्श्वभूमी असल्याचे दिसून येते.

या सर्व पार्श्वभूमीच्या आधारे आपणास असा निष्कर्ष निघतो की, बौद्ध धम्मातील या तंत्रयानावर वैदिक धर्मातील 'शाक्त' पंथाचा प्रभाव पडला होता व बदलत्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीनुसार बौद्ध धम्मात तंत्रयान पंथाचा उगम झाला. या तंत्रयानास व्रजयान असे देखील म्हटले जाते. 'व्रज' म्हणजे हिरा तसेच 'व्रज' असा ही होतो. हिऱ्यासारख्या कठीण, शरीर (काया) वाक (वाणी) आणि चित्त (मन) यांना त्रिव्रज म्हटले असून तसेच माध्यमिक पंथातील शून्यवादास व्रज व योगाचारपंथाच्या विज्ञान या तत्वास व्रज म्हटले आहे. व्रजयान पध्दतीनुसार शुध्द समाजासारख्या तंत्राने या वर्तमान जीवनात बुद्ध **u** अवस्था प्राप्त करता येते.

"तदिदैव जन्मनि गुह्यसमाजाभिरतो बोधसत्व.
सर्वतयागतानां बुद्ध इतिसंख्या गचति"

## तंत्रयान / व्रजयानाची पार्श्वभूमी:

व्रजयान पंथावर प्राचीन वैदिक धर्मातील शाक्त पंथाचा प्रभाव पडल्याचे जाणवते. हा शाक्त पंथ भारतामध्ये इ. स. **4** थ्या शतकापासून अस्तित्वात असल्याचे पुरावे मिळतात. कालीदासाच्या 'शाकुंतल' या नाट्यरचनेत 'परगतशक्ती' हे विशेषण लावल्याचे दिसून येते. इ. स. **828** मधील विश्वर्मन या मालव राजाच्या प्रस्तरलेखात मातृदेवता व तंत्र याचा उल्लेख आढळतो. पुराणातील विष्णूपुराणतही दुर्गेची पुजा ही तांत्रिक पुध्दतीने केली जात होती असा निर्देश आहे. त्याच्यानंतर हर्षाच्या काळात बाणभट्टाच्या कांदबरीमध्ये तंत्रपुजा, बळी, मंत्रतंत्र दुर्गास्त्रोत याचा संदर्भ आढळतो. सिंधू, संस्कृतीमध्येही मातृदेवतेच्या संदर्भातील स्टीएटाईट मुद्राआधारे मातृपुजा, बळी व पशुबळीची प्रथा प्रचलित असल्याचे दिसून येते. प्राचीन वैैदिक ग्रंथातील युजुर्वेदातील कृष्ण यजुर्वेदामध्ये प्रामुख्याने काळी जादू, जारण-मारण, तंत्रविद्या याचा समावेश आहे. एकंदरीत या सर्व सदंर्भाच्या आधारे भारतामध्ये तंत्र मंत्रपुजेची प्राचीन परंपरा असल्याचे सिध्द होते.

भारतीय बौद्ध धम्मातील वज्रयान पंथावर या प्रभावातून इ. स. **8** ते **12** व्या शतकापर्यंत बौद्ध धम्माची वाटचाल झाली व त्याचा एकंदरीत प्रभाव हा बौद्ध तत्त्वज्ञान व समाज जीवनावर पडला. प्रामुख्याने पूर्वभारत, हिमालयाच्या पायथ्याच्या भागातील वसाहती, तिबेट याभागात हा पंथ विस्तारीत झाला. या पंथाने धर्म व समाजकारणास प्रभावित केले

## शाक्त पंथाच्या तंत्राचे स्वरुप:

प्राचीन भारतीय धर्मतत्त्वज्ञानात वैदिक व बौद्ध तंत्रयान या दोन उपासना पध्दती आहेत. वज्रयान पंथाचे स्वरुप जाणण्यापूर्वी 'शाक्त' तंत्र म्हणजे काय**?** हे जाणून घेणे महत्त्वपूर्ण आहे. शाक्त तंत्राचा अर्थ खालील श्लोकाद्वारे स्पष्ट करता येते.

"तनोति विपुलानर्थन् तत्त्वमनासम न्वितान
त्राणं च कुरुते तन्तेमित्यभिधीयते"

अर्थ- तत्र आणि मंत्र यांनी युक्त अनेक अर्थ गोष्टी पसरविते, विशद करते आणि रक्षण करते ते तंत्र होय.

तंत्रामध्ये पाच 'म' कारांना महत्त्व दिले जाते. 'म' कार म्हणजे **1)** मदयपान **2)** मांसभक्षण **3)** मीन भक्षण **4)** मुद्र-भाजलेल्या तांदूळ किंवा लाह्या भक्षण **5)** मैथुन- या होत. या पंथात विधी करताना स्त्री पुरुष गोलाकार बसतात. त्याला श्रीचक्र हे नाव आहे. त्याप्रमाणेच वीरचक्र, महाचक्र, देवचक्र आणि राजचक्र असे चक्राचे सहा प्रकार असतात. शक्तीचे सहा प्रकार तंत्रामध्ये समाविष्ठ असतात ते मंत्र, बीज, यंत्र, कवच, न्यास आणि मुद्रा-मंत्र हे असून या मंत्रात 'ॐ**ò** ऱ्हीम इ.' रहस्यमय शब्दाचा अर्तभाव होतो. यात्रांत रहस्मय आकृत्या असतात त्याचे त्रिकोणाकृती स्वरुप असते. यंत्रामध्ये कमळाकृती मध्यावर शक्तीचे मुख काढलेले असते. कवच हा शब्द संपूर्ण स्तुती सुक्ताला उद्देशून वापरला जातो. न्यास म्हणजे शरीराची विविध अंगाना ही शक्ती सूपूर्द करणे, मुद्रामध्ये ही तत्त्वे बोटाचे विविध प्रकार, विभिन्न मुद्रेचा वेगळा अर्थ असतो. तांत्रिक आचारात एका विशिष्ट दिनी स्त्री पुरुषाचे एकत्र येणे आवश्यक असते. कारण स्त्री व पुरुष हे शिव व शक्तीचे प्रतिक मानले होते.

वरील वर्णनावरुन आपणास तंत्राचे व आचरणाचे गुंतागुंतीचे स्वरुप लक्षात येते. आता या आधारीत बौद्ध धम्मातील तंत्रयानाचे अथवा वज्रयानाचे स्वरुप पुढीलप्रमाणे पाहू

## वज्रयान पंथाचे तंत्र व स्वरुप:

बौद्ध धम्म तत्त्वावर अंतिम ध्येयाची निर्वाणाची प्राप्ती करुन घ्यायची असेल तर या धम्मातील वज्रयान व्यतिरिक्त सर्वच पंथीयांना चार आर्यसत्ये, अष्टांगिक मार्ग व पंथानुसार निर्माण झालेले असे विनयधम्माचे नियम पाळणे व दहा शिक्षापदांचे कठोर पालन करणे अनिवार्य असे.

महायान पंथानुसार निर्वाण अवस्था प्राप्त करण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागत असत. तेवढ्या जन्मात आचरणाची शुध्दता अत्यंत महत्त्वाची मानली आहे. हिनयानपंथाच्या आचरणाचे नियम महायानापेक्षाही अत्यंत कठोर स्वरुपाचे असल्याने, त्या पंथाबाबत अनास्था निर्माण होऊ लागली. महायानपंथाने अनेक जन्म व आचरण शुध्दता यावर दिलेला भर यामुळे हा विचार कालपरत्वे समाजातील काही वर्गाना अधिक दीर्घ व कालबाह्य वाटू लागला. अशावेळी तंत्रमार्गाचा अवलंब करुन निर्वाणाची अवस्था याच जन्मी प्राप्त करण्याचा हा मार्ग होता. या मार्गाचे समर्थक बुद्ध आणि बोधिसत्वास देखील याच मार्गाने धर्मातत्त्वाचे ज्ञान प्राप्त झाले असे मानतात. म्हणून तंत्रमार्गाच्या अनुयायामध्ये बुद्धत्व प्राप्ती करण्याकरिता हा मार्ग अधिक लोकप्रिय झाला.

या मार्गाने आपल्या गुह्यसमाज सुत्रसारख्या ग्रंथातून आपल्या तत्त्वाच्या संदर्भात विवेचन केले आहे. या पंथाने बौद्ध धम्माच्या काही तत्त्वाच्या बाबतीत अत्यंतिक टोकाचा मार्ग अवलंबिला. बौद्ध धम्माने ज्या अहिंसा तत्त्वावर भर दिला होता. त्याचा त्याग करुन या वज्रयानाने प्राणीमांस व मनुष्य मांस भक्षणाची परवानगी

दिली. वज्रयानाने प्राण्याची हिंसा, असत्य भाषण, कोणत्याही स्त्रीशी समागम, दान न दिलेल्या वस्तुचा परिग्रह करणे हे बुद्धाचे मार्ग असल्याचे प्रतिपादीत केले.

ज्यांना निर्वाणाची इच्छा आहे अशांनी कोणत्याही मार्गाने प्रज्ञा पारमिता मिळवावयास हवी, ही पारमिता स्त्रीरुपात सर्वत्र वास करते. परमानंदमोमा स्त्री समागमाची यांच्याशी सांगड घातली आहे. अति मानवी सिध्दी प्राप्तीसाठी योगाच्या आचरणाचा मार्ग त्यांनी सांगितला यात दोन प्रकारच्या सिध्दी आहेत. **1)** सामान्य सिध्दी **-** अदृश्य होणे **2)** बोधी अवस्था प्राप्त करणे.

सामान्य सिध्दीप्राप्तीत चार मार्गाचे प्रतिपालन आहेत. त्यास 'वज्र चतुष्क' असे म्हंटले जाते. योगाद्वारे ही परमसिध्द प्राप्त होते. ते घटक म्हणजे **1)**प्रत्यहार **2)** ध्यान **3)** प्राणायाम **4)** धारणा **5)** अनुस्मृती **6)** समाधी योगाच्या कल्पनेत 'गुरु' या व्यवस्थेत अधिक महत्त्व दिले गेले. पुढील काळात 'गुरु' पदास बुद्धाशी समानत्व प्रदान केले आहे, हे गुरु पंचमकारापैकी मंडळ, चक्र, यंत्र याची सखोल जाण असणारे असे असावे, हे अनिवार्य मानले गेले. बोधी अवस्था प्राप्त करण्यासाठी योगाचा मार्ग अनुसरण्यास सांगितले आहे. योगाद्वारे शक्तीची उपासना करुन निर्वाण प्राप्त करुन घेता येते असे हा पंथ मानतो. सततच्या प्रयत्नाने जर अपयश आले. तर हटयोगाचा मार्ग अवलंबावा, या मार्गाने गेल्यास बोधी अवस्था प्राप्त होते. बोधी अवस्था प्राप्त करण्यासाठी योगाचरण करणाऱ्यास मांसभक्षण, आणि मैथुन याची परवानगी दिली होती.10

योगाचरणाद्वारे बोधीप्राप्ती करणाऱ्यास पाच 'मंकारातील' मैथुनास देखील महत्त्व दिले आहे. 'गुह्यसमाज तंत्र' या ग्रंथात असे म्हटले आहे की, 'मनशक्ती आणि अतिमानवी सिध्दी याची प्राप्ती करुन घ्यायची असेल तर यौगिक आचरण करणाऱ्या स्त्रियांशी दृढ संपर्क ठेवावा. प्राचीन बौद्ध धम्म तत्त्वाने ज्या गोष्टी निशिध्द मानल्या त्यास आपल्या पंथात सामावून घेतले. त्या सामावलेल्या तत्त्वाच्या आधारे (मासं, मद्यभक्षण मैथुन) याद्वारे बोधीप्राप्ती होते. हा विरोधात्मक विचार प्रसृत केला.

योगाचाराप्रमाणे या पंथाने अतिमानवी शक्ती प्राप्त करणे, जारण-मारण, जादुटोणा करणे या आधारे शत्रुचा नाश करणे. रोगाचे जादुद्वारे निवारण, 'वशीकरण' 'स्तंभन' दुसऱ्याच्या हालचाली थांबवणे 'विद्वेषण' परस्पर मैत्रीभाव बाळगणाऱ्या व्यक्तीत वितुष्ट निर्माण करणे 'उच्चटण' एखाद्या व्यक्तीस गाव सोडून जाण्यास भाग पाडणे, 'मारण' प्राणीमात्राची हत्या करणे यासारख्या अघोरी व अशास्त्रीय पध्दतीचा स्वीकार या पंथाने आपल्या तत्त्व आचरणात केला. या पंथाचा प्रभाव सर्वदूर भारतात पसरला नसला तरी भारतातील पूर्वोत्तर भागात हा पंथ अत्यंत लोकप्रिय झाला.

वज्रयान पंथाने कामाख्य, सिरिहट्ट, पुर्णगिरी आणि उडियान ही चार पीठे तांत्रिक कल्पनाचा प्रसार करणेसाठी स्थापन केली होती.

अशाप्रकारे महायानापासून तंत्रामार्गाचा अवलंब करुन विलग झालेला तंत्रयान किंवा वज्रयान हा पंथ आपला प्रभाव इ. स. **8** ते **12** व्या शतकात प्राचीन भारतामध्ये निर्माण करतो. या पंथाची तत्त्वे, स्वरुप व आचरणाचे नियम हे प्राचीन मूळ शुध्द बुद्ध धम्माच्या अगदी विपरीत स्वरुपाचे होते. या पंथाने पंथ 'मकार' दिलेले स्थान, हे बुद्धाच्या मूळ सिध्दांतास धक्का लावणारे ठरले. बुद्धांनी नाकारलेल्या अमानवी सिध्दीचा त्यांनी स्वीकार केला. चमत्कार, योगसिध्दी, हटयोग, जादुटोणा या मार्गाचा उपयोग त्यांनी केला, वस्तू या तत्त्वास कोठेही बौद्ध धम्मात स्थान दिलेले नव्हते.

वैदिक शाक्तपंथाच्या प्रभावातून या पंथाचा उगम झाला असला तरी हा पंथ मर्यादित स्वरुपात प्राचीन भारतात विस्तारीत झाला. स्त्रीसंग व समागम या तत्त्वाचा त्यांनी केलेला स्वीकार हा बौद्ध धम्मातील सद्वर्तन व नैतिकता या तत्त्वांना हरताळ फासणारे होते. बौद्ध संघात मद्य, मांस, मैथुन याचा शिरकाव झाल्याने एका पंथाने अवलंबलेला हा अनैतिक, अशास्त्रीय व तर्कहीन मार्ग हा इतर पंथाच्या प्रामाणिक कर्तव्यास व कृत्यास

संशय निर्माण करणारा ठरला. भिक्षु विचारांच्या लोकप्रियतेचा कालखंड असताना लोकभिमुख अशी महानपंथी विचारसरणी या पंथाने मागे सारली. धर्म प्रसाराच्या या काळात वैदिक धर्माने स्वदोषाचे निवारण करुन धर्म पुनर्रचनेस व धर्म अधिक लोकाभिमुख करावयाचा मार्ग स्वीकारत असताना, तंत्रयानाने धम्मास आपल्या तत्त्वांच्या व आचरणाच्याद्वारे दुषीत करुन धम्माची अधोगती केली.

शंकराचार्यांचे आक्रमक असे धर्म पुनर्स्थापण्याच्या धोरणाच्या काळात महायान पंथातील शून्यवाद व वज्रयान पंथातील अनैतिकतेस लक्ष्य केले व या मार्गास वैदिक धर्मात स्थान न दिल्याचे प्रकर्षाने जनमानसाच्या निदर्शनास आले त्या कारणास्तव वैदिक धर्म हा बौद्ध धम्मास इ. स. **9** व्या शतकानंतर मागे रेटण्यास यशस्वी ठरला.

अशा विविध नकारात्मक बाबी वज्रयान पंथात असल्या तरी वज्रयानांनी परंपरागत वर्णव्यवस्था, जातीवाद यांना प्रखर विरोध केला. कोणत्याही सामान्य व्यक्तीस वज्रयान मार्गाचे अनुसरुन केल्याने बोधीप्राप्ती होऊ शकते असा सिध्दांत मांडला. या तंत्रवादाचा प्रसार व भारतातील कनिष्ठ वर्णातील वंचीत, उपेक्षीत वर्गात मोठ्या प्रमाणात झाला. वर्णाश्रमास विरोध, जातीभेद, त्याग, योग या सकारात्मकतेच्या जोरावर बदलत्या राजकीय, भौतिक व सांस्कृतिक परिस्थितीमध्ये वज्रयान पंथ हा इ. स. **8** ते **12** व्या शतकापर्यंत समाजातील विशिष्ट पंथवादी, मतवादी व परंपरावादी, दीर्घकाळ परिश्रम करुन बोधीमुक्ती व मोक्ष प्राप्त करु इच्छिणाऱ्या वर्गाच्या मतास एक समर्थ असा विरोधी पर्याय म्हणून उभा राहिला, यास आपण नाकारु शकत नाही.

## संदर्भ सुची:


**01)** डांगे सिंधू, बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान, कॉन्टीनेंन्टल प्रकाशन पुणे **2002,** पृ.क्र.264

**02)** जोशी लालमणी, द बुद्धीस्टीक कल्चर इन इंडिया, मोतीलाल बनारसीदास नवी दिल्ली **2002,** पृ.क्र.236

**03)** जोशी लालमनी, इ बुद्धीस्टीक कल्चर इन इंडिया, मोतीलाल बनारसीदास, नवी दिल्ली **2002,** पृ.क्र.247

**04)** गुहृयसमाज सुत्र पृ.क्र.144

**05)** काणे पी. व्ही. हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र खंड पाचवा , पुणे **1962,** पृ.क्र.1038-49

**06)** ढवळीकर म. के. कोणे एकेकाळी सिंधु संस्कृती राजहंस प्रकाशन पुणे

**07)** डांगे सिंधू, बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान कॉन्टीनेंन्टल प्रकाशन पुणे **2008,** पृ.क्र.367

**08)** जोशी लालमनी, द बुद्धीस्टीक कल्चर इन इंडिया मोतीलाल बनारसीदास नवी दिल्ली **2002,** पृ.क्र.285

**09)** कित्त पृ.क्र.285

**10)** डांगे सिंधू, बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान कॉन्टीनेंन्टल पुणे **2008,** पृ.क्र.270